Indian Academy of Pediatrics (IAP)

महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

## प्रकरण १६ :

# तोतरे बोलणे एक समस्या

मुल बोलायला लागल्यावर त्याचे चिमखडे बोल ऐकायला सर्वांनाच आवडतात. मात्र कधीतरी वेगवेगळ्या कारणाने त्याच्या वाचेत काही दोष उत्पन्न झाल्यास त्यावर अनेक अशास्त्रीय सूचनांचामाराहोतो, शिवाय उपायही नीट होत नाहीत. अशावेळी पालकांना योग्य मार्गदर्शनाची गरज भासते. आज आपण तोतरेपाणाची कारणे आणि उपायांबद्दल तज्ज्ञांची मते ऐकुया.


अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया

सचिव २०२२–२३ : डॉ. अमोल पवार

मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये

समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर

अनुवाद : डॉ. चंद्रशेखर दाभाडकर

पुनरावलोकन : डॉ. चित्रा दाभोळकर, अनंत घोटगाळकर

*Convener:* **Manisha Mukhija**

*Members:* **Durga Prasad Paleti, Girish Chandra Agrawal, Gurdeep Singh**

*Reviewer:* **Nandita Chatterjee**




## 10 FAQs on STAMMERING AND STUTTERING

१) माझा एक पाच वर्षाचा मुलगा आहे. तो स्पष्टपणे बोलत नाही आणि बोलताना अडखळतो. याला तो तरेपणा म्हणावे का?

२) मला एक दोन वर्षाची मुलगी आहे. तिची वाढ आणि विकास हा इतर बाळांसारखाच होत आहे. परंतु ती तुटक–तुटक शब्दात बोलते आणि त्याच त्या आवाजाची पुनरावृत्ती करते. हे तिच्या वयाच्यादृष्टीने योग्य आहे का आणि जर असेल तर ती कोणत्या वयात चांगले बोलू शकेल?

३) मला ६ वर्षाची मुलगी आहे आणि तिची तोतरे बोलण्याची सवय अजून गेली नाही. हे कशामुळे झाले असेल?

४) मला एक सात वर्षाचा मुलगा आहे जो तोतरा बोलतो. मला त्याची फारशी काळजी वाटत नाही, पण त्याला  लक्षात न येणारे आणखी काही शारीरिक आजार असू शकतील का जे तोतऱ्या मुलात भविष्यात कधीही उद्भवू शकतात?

५) माझी आठ वर्षांची मुलगी अनोळखी लोकांशी बोलण्याचे टाळते आणि शाळेतल्या कुठल्याही कार्यक्रमात सहभागी होत नाही. ती क्वचित तोतरे बोलते. या करता मी काय करायला पाहिजे?

६) आमचा चार वर्षाचा मुलगा स्पष्ट बोलत नाही आणि बोलताना अडखळतो. त्याच्या उपचाराबद्दल आमच्याच घरी मतभेद आहेत. आजी–आजोबा असे म्हणतात की वय वाढले की बोलेल तो बरोबर! पण मला व माझ्या पत्नीला सतत असे वाटते की आपण वैद्यकीय सल्ला त्वरित घ्या व या सहवा. वैद्यकीय सल्ला कुठल्या वयात घ्यावा

७) आमचा मुलगा तोतरे बोलतो. पण आम्ही त्याच्याकरता वैद्यकीय उपचार करून घ्यायला घाबरत आहोत. कारण तोंडात दगड ठेवून बोलणे किंवा तशाच विचित्र पद्धती उपचाराकरता वापरल्या जातात असे आम्ही ऐकले आहे. कुठल्या उपचार पद्धती वापरल्या जातात याबद्दल तुम्ही आम्हाला काही मार्गदर्शन करू शकाल का?

८) डॉक्टर, माझी मुलगी तोतरेपणाकरिता स्पीच थेरपी घेतआहे. पण पालक म्हणून मी गोंधळलेल्या अवस्थेत आहे. प्रत्येकवेळेस ती तोतरे बोलताना मी तिचे बोलणे दुरुस्त करायला हवे की त्याकडे दुर्लक्ष करावयास हवे. तुम्ही मला काही सूचना करू शकाल का?

९) माझ्या नऊ वर्षाच्या मुलाला तो अडखळत बोलतो म्हणून स्पीच थेरपी चालू होती. बोलण्यात सुधारणा झाल्यानंतर मागील वर्षी आम्ही स्पीचथेरपी बंद केली. पण आम्हाला आता काळजी वाटते की तो पूर्ण बरा झाला आहे की त्याचे अडखळत बोलणे परत सुरू होईल?

१०) मला दोन मुले आहेत. मोठा मुलगा लहानपणी अडखळत बोलायचा. माझी पाच वर्षाची मुलगी सध्या स्पष्ट बोलते. पण पुढील आयुष्यात ती मोठ्या मुलासारखी अडखळत बोलेल का?


**Under the Auspices of the IAP Action Plan 2020–2021**

**Piyush Gupta** IAP President 2021

**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021

**Bakul Parekh** IAP President 2020

**GV Basavaraja** IAP HSG 2020–2021

**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

16

# तोतरे बोलणे एक समस्या

प्रश्न (१)

**माझा एक पाच वर्षाचा मुलगा आहे. तो स्पष्टपणे बोलत नाही आणि बोलताना अडखळतो. याला तोतरेपणा म्हणावे का?**

होय ! हा तोतरेपणा आहे. त्याबद्दलची ही काही अधिक माहिती. तोतरेपणा ही प्रवाही आणि सलग बोलण्यात व्यत्यय आणणारी एक विकृती आहे. हा वाचादोष आहे. हा पालकांच्या लक्षात येतो. याचे साधारण प्रकार खालीलप्रमाणे आहेत.

- **पुनरुच्चार :** त्या त्या आवाजाचा, अक्षराचा, किंवा शब्दांचा बोलताना पुनरुच्चार करणे. बोलताना आवाज अपूर्ण काढले जातात किंवा पूर्ण काढले जातात. जेव्हा फक्त व्यंजनांचा पुनरुच्चार केला जातो (उदा: म्... म्.... मला) तेव्हा त्याला अपूर्ण पुनरावृत्ती म्हणतात. जेव्हा स्वर आणि व्यंजन दोन्हीचा पुनरुच्चार केला जातो त्यास संपूर्ण पुनरुच्चार म्हणतात. जेव्हा पूर्ण शब्दच परत परत उच्चारला जातो (उदा. मला पाणी.... पाणी..... पाणी..... पाहिजे) त्याला बहुअक्षरी पुनरुच्चार म्हणतात
- **व्यत्यय :** या वाणीदोषात मूल बोलता–बोलता, लक्षात येण्याइतपत थांबते. हे थांबणे सहसा वाक्याच्या सुरुवातीलाच असते. पण ही समस्या वाक्यात कधीही येऊ शकते.
- **बोलणे लांबविणे :** बोलण्याच्या सुरुवातीलाच काही आवाज लांबवले जातात (उदा: क्क्क् कावळा, द्द्दूध). काही आवाज बोलताना काढणे/ टाकणे तोतरे मूल बरेचदा थोडेसे थांबून अचूक उच्चार करते किंवा अं, हं, असे काहीतरी आवाज काढून,किंवा काही कृती करून (श्वास सोडणे, घसा साफ करणे) अशी काहीतरी क्रिया करून अचूक शब्द उच्चारते.

एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हा तोतरेपणा भाषा समजण्यात, वाचन करण्यात किंवा लिहिण्यात अडथळा ठरत नाही. किंबहुना मुलांच्या बुद्धिमत्तेचा, विकासाचा आणि तोतरेपणाचा काहीही संबंध नसतो. हा तोतरेपणा वयाच्या दुसऱ्या वर्षापासून ते पाच वर्षापर्यंत कधीही उद्भवतो.

प्रश्न (२)

**मला एक दोन वर्षाची मुलगी आहे. तिची वाढ आणि विकास हा इतर बाळांसारखाच होत आहे. परंतु ती तुटक-तुटक शब्दात बोलते आणि त्याच त्या आवाजाची पुनरावृत्ती करते. हे तिच्या वयाच्या दृष्टीने योग्य आहे का आणि जर असेल तर ती कोणत्या वयात चांगले बोलू शकेल?**

भाषा विकास ही एक अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया असते. त्यासाठी मेंदूमधील विविध केंद्रामध्ये संपर्क असणे जेवढे आवश्यक असते तेवढेच घसा, जबडा, जीभ, चेहरा आणि श्वासपटल यांचा योग्य तो समन्वय असणे आवश्यक असते. बाळाच्या भाषेचा विकास दोन वर्ष ते पाच वर्ष या काळात अत्यंत जलद होतो. याच वयात भाषेच्या प्रवाहीपणात व्यत्यय येण्याची शक्यता असते. कारण या वयात मुले शब्दांचे उच्चार भरभर करतात आणि अत्यंत जलदगतीने व्यक्त होण्याचा प्रयत्न करतात. याला प्रवाहीपणाचा व्यत्यय (speech dysfluency) असेही म्हणता येईल आणि मूल कालांतराने, पाच वर्षानंतर चांगले बोलू लागते. जेव्हा मूल खूप उत्तेजित असते, त्याला काही सांगायचे असते किंवा तणावाखाली असते तेव्हा ही समस्या जास्त दिसून येते. याला deveopmental dysfluency असे म्हणतात. याचा मुलांच्या भावनिक अथवा सामाजिक विकासावर परिणाम होत नाही. पण पाच वर्षानंतरही मुलात हा उच्चार दोष दिसून आला किंवा तो दोष सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी टिकून राहिला तर वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे.

प्रश्न (३)

**मला ६ वर्षाची मुलगी आहे आणि तिची तोतरे बोलण्याची सवय अजून गेली नाही. हे कशामुळे झाले असेल?**

तोतरेपणा हा जवळजवळ १% प्रौढांमध्ये दिसून येतो तर मुला मुलीत हेच प्रमाण ५% पर्यंत असते. मुलांमध्ये मुलींपेक्षा हे प्रमाण चौपट असते. तोतरेपणाची निश्चित कारणे सांगणे अवघड आहे. ज्या मुलांच्या पालकात तोतरेपणा असतो त्या मुलात तोतरेपणाची शक्यता जास्त असते(अनुवंशिक). मात्र मुलगा तोतरे बोलत असेल तर पालकांनी स्वतःला दोषी समजू नये.

बरीचशी मुले या बोलण्याच्या व्यंगावर मात करतात व पाच वर्षानंतर सामान्य (normal) बोलू लागतात. पण जे मूल चार आठवड्यापेक्षा जास्त काळ तोतरे बोलते, ज्यांच्या पालकात हा वाणीदोष आहे किंवा या तोतरेपणामुळे बाळाच्या विकासात अडथळा निर्माण होतो त्यांनी वैद्यकीय सल्ला अवश्य घ्यावा. बहुतेकवेळा वैद्यकीय सल्ल्याशिवाय काही मुले न अडखळता बोलू शकतात. पण ही सुधारणा अत्यंत संथगतीने होते. ज्या मुलात तोतरेपणा एक वर्षापेक्षा अधिक काळ राहतो किंवा वयाच्या सहाव्या वर्षानंतरही कायम असतो अशा मुलांमध्ये पुढील आयुष्यात देखील हा तोतरेपणा कायम रहाण्याची शक्यता असते.

प्रश्न (४)

**मला एक सात वर्षाचा मुलगा आहे जो तोतरा बोलतो. मला त्याची फारशी काळजी वाटत नाही, पण त्याला लक्षात न येणारे आणखी काही शारीरिक आजार असू शकतील का जे तोतऱ्या मुलात भविष्यात कधीही उद्भवू शकतात?**

तोतरेपणाचा विकासात्मक वाचादोष (developmental stuttering) हा बरेचदा इतर आजारांशी संबंधित नसतो. तरी देखील काही वर्तन समस्या उदा अतिचंचलता ADHD, स्वमग्नता Autism, शिकण्याची अक्षमता, औदासीन्य या काही आजारांत वाचादोष असू शकतो. तसेच वाचादोष असलेल्या मुलात दमा, अॅलर्जीचे आजार इत्यादी आजारांचे प्रमाण जास्त असू शकते. वाचादोष असणाऱ्या मुलांची मानसिक तपासणी करणे कधीही चांगले. काही मुलांमध्ये तोतरेपणा जन्मजात नसतो आणि तो नंतर उद्भवतो. नीट व्यवस्थित बोलणारा मुलगा अचानक तोतरे बोलू लागतो. या मुलामध्ये मात्र मज्जासंस्थेच्या व्याधीकरिता संपूर्ण वैद्यकीय व मानसिक तपासणी करणे आवश्यक आहे

प्रश्न (५)

**माझी आठ वर्षांची मुलगी अनोळखी लोकांशी बोलण्याचे टाळते आणि शाळेतल्या कुठल्याही कार्यक्रमात सहभागी होत नाही. ती क्वचित तोतरे बोलते. या करता मी काय करायला पाहिजे?**

तोतरेपणाचा मुलाच्या एकंदर व्यक्तिमत्त्वावर व भावविश्वावर विपरीत परिणाम होऊ शकतो. जसजसे मूल वाढत जाते तसतशी या मुलांना आपल्या तोतरेपणाची जास्त जाणीव होत जाते आणि त्यामुळे या मुलांना चार लोकात, मित्र–मैत्रिणीत, नातेवाईकात बोलण्याची भीती वाटते. त्यांचा आत्मसन्मान, आत्मविश्वास कमी होतो. क्वचित त्यांच्यात वैफल्यही दिसते. ही मुले बरेचदा त्यांच्या मित्र–मैत्रिणींच्या चेष्टेचा विषय होतात आणि त्यांच्या भावना दुखावल्या जातात. जी मुले आपल्या या दोषाबद्दल जास्त जागरूक असतात, ती मुले हा दोष लपविण्याकरता प्रयत्न करतात. त्यांच्यात ताण निर्माण होतो. त्यांच्या एकूण व्यक्तिमत्वावर याचा जास्त गंभीर परिणाम होतो.

योग्यवेळी चिकाटी ठेवून योग्य ते उपचार केले, सकारात्मक दृष्टिकोन असला आणि मुलाला भावनिक आधार दिला तर मुलात आश्चर्यकारक बदल होऊ शकतात. सर्व कुटुंबियांचे, मित्रांचे, शाळेचे व स्पीच थेरपिस्टचे सहकार्य आणि समुपदेशन यामुळे मुलातील नकारात्मक विचार कमी होऊन त्याचे व्यक्तिमत्व सुधारू शकते.

**प्रश्न (६)**

**आमचा चार वर्षाचा मुलगा स्पष्ट बोलत नाही आणि बोलताना अडखळतो. त्याच्या उपचाराबद्दल आमच्याच घरी मतभेद आहेत. आजी-आजोबा असे म्हणतात की वय वाढले की बोलेल तो बरोबर! पण मला व माझ्या पत्नीला सतत असे वाटते की आपण वैद्यकीय सल्ला त्वरित घ्या व या सहवा. वैद्यकीय सल्ला कुठल्या वयात घ्यावा**

या वाचादोषाकरिता तुम्ही जेवढ्या लवकर उपचार सुरु कराल तेवढा त्याचा फायदा अधिक होईल. शाळेत जाण्यापूर्वी हे उपचार सुरू केल्यास त्वरित आणि जास्तीत जास्त लाभ होऊ शकेल. अगदी लहान मुलात आपल्या या वाचादोषाबद्दल फारशी जाणीव नसते आणि त्यामुळे लवकर उपचार सुरू केले तर त्याच्या व्यक्तिमत्त्वावर होणारा नकारात्मक परिणाम टाळता येतो हे विशेष.

- स्पीचथेरपी (वाचादोष उपचारपद्धती) करण्याची योग्यवेळ.
- जर कुटुंबात कुणाला तरी हा वाचादोष असेल.
- तुमचा मुलगा/मुलगी चारचौघात, मित्र-मैत्रिणीत बोलायला घाबरत असेल.
- शाळेत विविध समस्या निर्माण होत असतील.
- मुलांच्या स्वभावात किंवा वर्तणुकीत काही वेगळे विशेष कारण नसताना फरक पडत असेल.
- तोतरेपणा चार आठवड्यांपेक्षा जास्त काळ असेल.

**प्रश्न (७)**

**आमचा मुलगा तोतरे बोलतो. पण आम्ही त्याच्याकरता वैद्यकीय उपचार करून घ्यायला घाबरत आहोत. कारण तोंडात दगड ठेवून बोलणे किंवा तशाच विचित्र पद्धती उपचाराकरता वापरल्या जातात असे आम्ही ऐकले आहे. कुठल्या उपचार पद्धती वापरल्या जातात याबद्दल तुम्ही आम्हाला काही मार्गदर्शन करू शकाल का?**

तोतरेपणा पूर्णतः जाऊ शकत नाही. यातील उपचाराची उद्दिष्टे मुलाचे बोलणे 'तोतरेपणा ओळखता येणार नाही या स्थितीपर्यंत' आणून ठेवणे, त्याच्या व्यक्तिमत्त्वावर आणि करियर निवडीमध्ये अडचण न येणे, त्याच्या भावनांवर व मानसिक स्थितीवर कुठलाही परिणाम होऊन देणे ही आहेत.

या वाचादोषांचे उपचार लक्षणांच्या तीव्रतेवर अवलंबून असतात. त्यात प्रामुख्याने स्पीच थेरपी व वर्तणूक समस्येवर उपचार यांचा अंतर्भाव असतो. यात प्रामुख्याने खालीलप्रकारे उपाय योजले जातात

- संथ व आरामात बोलणे.
- बोलताना श्वासोच्छवासाचे तंत्र अवलंबणे.
- ताणतणा व व्यवस्थापन करणे
- आत्मविश्वास निर्माण करणे.
- ज्या अक्षरांची/शब्दांची पुनरावृत्ती होते ते पुन्हा पुन्हा शिकविणे.
- काळजी निर्माण करणाऱ्या वर्तन समस्यांवर उपचार करणे.
- समूहाने एकत्र सूरात (chorus) बोलणे.
- इलेक्ट्रॉनिक उपकरणांची व ॲप्सची मदत घेणे.

याकरिता जी औषधे उपलब्ध आहेत त्यांचा उपयोग केवळ गंभीर व तीव्र प्रकारच्या आजारातच करावयाचा असतो. सौम्य आजारात ती मुळीच वापरू नयेत. ८० टक्के मुले स्पीच थेरपी व वरील उपायांनीच बरी होतात





Ch-016.indd 6 08-09-2021 14:06:04

प्रश्न (८)

**डॉक्टर, माझी मुलगी तोतरेपणाकरिता स्पीच थेरपी घेत आहे. पण पालक म्हणून मी गोंधळलेल्या अवस्थेत आहे. प्रत्येकवेळेस ती तोतरे बोलताना मी तिचे बोलणे दुरुस्त करायला हवे की त्याकडे दुर्लक्ष करावयास हवे. तुम्ही मला काही सूचना करू शकाल का?**

तुमच्या मुलीला उपयोगी पडतील अशा अनेक गोष्टी तुम्हाला करता येतील.

- सगळ्यात महत्वाचे म्हणजे यात संयम आणि चिकाटी हवी.
- स्वतःचे तर्क करू नका.
- तुम्ही हे लक्षात घ्या की तुमची मुलगी तुम्हाला संतप्त करण्याकरता तोतरे बोलत नाहीतर ही तिची समस्या आहे आणि ती समस्या तिला सोडविता येत नाही.
- घरचे वातावरण तिला व्यक्त होण्याकरता आनंदी ठेवा.
- 'प्रश्न आणि त्याचे उत्तर' असा संवाद करण्यापेक्षा तिला मजेदार आणि रोमांचक वाटेल असा संवाद साधा.
- तिच्या डोळ्यात डोळे घालून बोला.
- तिच्या प्रयत्नांची प्रशंसा करा आणि तिला प्रोत्साहन द्या
- तिच्या एकटीशी अडथळ्याविना संवाद साधता येईल असा वेळ काढा.
- तिच्याबरोबर श्वसनाचे व्यायाम (प्राणायाम) करा.
- तुम्ही सावकाश बोला जेणेकरून तीपण सावकाश बोलायला शिकेल.
- तिच्याबरोबर गाणे म्हणा, कविता म्हणा, वाचन करा.
- सतत सूचना देऊनका आणि ती बोलताना अडखळेल/तोतरे बोलेल तेव्हा तुमची निराशा दर्शवू नका.
- जेव्हा तुमचे मुल तोतरे बोलत असेल तेव्हा ही वस्तुस्थिती स्वीकारा, त्यात लाजण्यासारखं काहीही नाही हे लक्षात ठेवा.
- तुमचा तुमच्या पाल्याकडे आणि त्याच्या व्यक्तिमत्वाकडे बघण्याचा दृष्टिकोन सकारात्मक हवा.
- तुमचे सर्व कुटुंबिय, मित्र आणि शिक्षक या सर्वांना त्याच्या या व्यंगाबद्दल सांगा, त्यांना प्रशिक्षित करा.
- त्यांना मदत आणि प्रोत्साहन द्यायला सांगा. या व्यंगामुळे तिला कुणी चिडवणार नाही याची काळजी घ्या.
- आयुष्यात सुखदुःखाचे चढ–उतार असणारच. या वाणीदोषामुळे तुमच्या मुलीच्या मनात तणाव निर्माण होत असेल तर हा तणाव दूर करण्याचा प्रयत्न करा आणि या तणावग्रस्त काळात मोठ्याने वाचणे, बोलणे, चार लोकात मिसळणे काही दिवसांकरता बंद करा.
- तुमच्या मुलीत आणखीन ही काही चांगली कौशल्ये असतील. त्यामुळे वाणीदोषावर जास्त लक्ष केंद्रित न करता इतर कौशल्ये विकसित करा





Ch-016.indd 7 08-09-2021 14:06:04

प्रश्न (९)

**माझ्या नऊ वर्षाच्या मुलाला तो अडखळत बोलतो म्हणून स्पीच थेरपी चालू होती. बोलण्यात सुधारणा झाल्यानंतर मागील वर्षी आम्ही स्पीचथेरपी बंद केली. पण आम्हाला आता काळजी वाटते की तो पूर्ण बरा झाला आहे की त्याचे अडखळत बोलणे परत सुरू होईल?**

तोतरेपणाला १००% उपाय नाही. पण स्पीचथेरपी लवकर सुरू केली तर मोठेपणी याचा निश्चितच फायदा होतो. स्पीचथेरपीमुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या अनेक भावनिक व मानसिक समस्या कमी करता येतात आणि एकंदरच व्यक्तिमत्वावर होणारा नकारात्मक परिणाम टाळता येतो.

महत्त्वाचे हे की आपण शिकलेलीही कौशल्ये सातत्याने आचरणात आणली पाहिजेत. आयुष्यातले ताण तणाव भावनिक व मानसिक समस्या यामुळे हा दोष परत उद्भवू शकतो. बहुतेक वेळेस ही समस्या काही कालावधी करताच राहते. पण काही प्रसंगी (उदा. शाळेतून महाविद्यालयात प्रवेश, नवीन ठिकाणी वास्तव्य) ही समस्या परत उद्भवते. ही समस्या परत उद्भवली तर त्या वेळेस मानसिक आधार देणे आवश्यक आहे. क्वचित प्रसंगी पुढील आयुष्यात, विशेषत: जवळच्या माणसाचा मृत्यू किंवा आजूबाजूच्या परिस्थितीत बदल झाल्यास, परत स्पीचथेरपी सुरू करणे ही आवश्यक असते.

प्रश्न (१०)

**मला दोन मुले आहेत. मोठा मुलगा लहानपणी अडखळत बोलायचा. माझी पाच वर्षाची मुलगी सध्या स्पष्ट बोलते. पण पुढील आयुष्यात ती मोठ्या मुलासारखी अडखळत बोलेल का?**

तोतरेपणा ही बहुतांशी बाळाच्या विकासाशी निगडित समस्या आहे आणि त्यामुळेही समस्या वयाच्या पाच वर्षांपूर्वीच सुरू होते. काही मुलात ही समस्या पाच वर्षापर्यंत लक्षात येत नाही आणि शाळा सुरू झाल्यानंतरच लक्षात येते.

मोठेपणी मेंदूवर होणारा आघात, मेंदूमधील संसर्ग आणि मज्जासंस्थेचे काही विशिष्ट आजार यामुळे तसेच काही औषधांमुळे हा वाचादोष उद्भवू शकतो. क्वचितप्रसंगी काही तीव्र भावनिक व मानसिक धक्क्यामुळे प्रौढांत देखील हा आजार उद्भवू शकतो.